सुविचार
**श्वास** घेणं आणि सोडणं ह्याला
**जगणं** म्हणत नाहीत,
प्रत्येक **श्वास** घेताना आसमंतातल्या
**सुगंधाचा** प्रत्यय आला पाहिजे.

दैनिक अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३०२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१३ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# गुटखा, तंबाखू विरोधात तुकाराम मुंढे यांचा सर्वात मोठा आदेश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मुंबई :** महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या संघटीत्त अवैध व्यापाराला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थाचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटीत नेटवर्क्सविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ म्हणजेच मकोका लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज स्पष्ट आदेश दिले आहेत.

भारताच्या संविधानाच्या कलम ४७ नुसार सार्वजनिक आरोग्य सुधारण्याची आणि आरोग्यास अपायकारक पदार्थांच्या सेवनास प्रतिबंध करण्याची जबाबदारी राज्यावर आहे. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला आणि अशा प्रकारचे प्रतिबंधित पदार्थ हे सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणारे आहेत. या पार्श्वभूमीवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या कलम ३० (२) (अ) अंतर्गत राज्यात अशा पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्रीवर प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तथापि, प्रतिबंध असूनही काही ठिकाणी या पदार्थांचा अवैध व्यापार पद्धतशीर, संघटित आणि आर्थिक फायद्यासाठी होत असल्याचे अंमलबजावणी यंत्रणांच्या निदर्शनास आले आहे. अन्न व औषध प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांच्या कारवायांमधून असे दिसून आले आहे की, काही प्रकरणांमध्ये केवळ किरकोळ विक्रेतेच नव्हे, तर उत्पादक, पुरवठादार, वित्तपुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक, घाऊक विक्रेते, उप-विक्रेते आणि इतर सहाय्यक घटक यांचा समन्वयित सहभाग असतो. अनेक वेळा बनावट कागदपत्रे, बनावट चलने, डमी कंपन्या, बेनामी व्यवहार, गुप्त गोदामे, आंतरराज्य पुरवठा साखळी, तसेच वाहतूक व वितरणासाठी विविध मार्गाचा वापर केला जातो. त्यामुळे अशा कारवाया केवळ अन्नसुरक्षा उल्लंघनापुरत्या मर्यादित न ठेवता, पात्र प्रकरणांत संघटीत गुन्हेगारीच्या दृष्टीने तपासल्या जाणे अपेक्षित आहे. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत असुरक्षित अन्नाचे उत्पादन, साठवणूक, वितरण किंवा विक्री करणे हा गंभीर गुन्हा आहे. सदर अधिनियमाच्या कलम ५९ अंतर्गत अशा गुन्ह्यांसाठी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत असुरक्षित अन्नाचे उत्पादन, साठवणूक, वितरण कारावासाची तरतूद आहे. कलम ६४ अंतर्गत पुनरावृत्ती झाल्यास वाढीव शिक्षेची तरतूद आहे. तसेच कलमे ३८ व ४१ नुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तपासणी, शोध व जप्तीचे अधिकार देण्यात आले आहेत. कलम ४२ अंतर्गत अभियोजन सुरू करण्याची प्रक्रिया नमूद आहे.

**तीन वर्ष कारावासाची शिक्षा**

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ अंतर्गत सतत चालणारी बेकायदेशीर कृती, संघटित गुन्हा आणि संघटित गुन्हेगारी सिंडिकेट याबाबत स्पष्ट तरतुदी आहेत. एखादा गुन्हा दखलपात्र असून तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षेस पात्र असेल, मागील दहा वर्षांत एकापेक्षा अधिक आरोपपत्रे दाखल झालेली असतील आणि न्यायालयाने त्यांची दखल घेतलेली असेल, तसेच दोन किंवा अधिक व्यक्ती आर्थिक लाभासाठी समन्वयाने कार्यरत असतील, तर अशा प्रकरणात मकोका लागू करण्याची पात्रता तपासून कारवाई करण्याचे तुकाराम मुंढे यांनी निर्देश दिले आहेत.

**तुकाराम मुंढे यांचे अधिकाऱ्यांना महत्त्वाचे आदेश**

या निर्देशांनुसार, प्रतिबंधित अन्नपदार्थांशी संबंधित प्रत्येक अंमलबजावणी कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी आणि नामनिर्देशित अधिकारी यांनी मकोका लागू होण्याची पात्रता तपासणे आवश्यक राहील. पात्रता सिद्ध झाल्यास संबंधित प्रकरणात अन्न सुरक्षा व मानके अधिनियमातील लागू तरतुदींसह मकोका अंतर्गतही कारवाई करण्यासाठी पोलिसांशी समन्वय साधला जाईल. मात्र, मकोका लागू करण्यासाठी अधिनियमाच्या कलम २३ अंतर्गत आवश्यक असलेली प्रक्रिया काटेकोरपणे पाळली जावी, असे तुकाराम मुंढे यांनी निर्देश दिले आहेत.

**कारवाईचा नेमका उद्देश काय?**

सदर निर्देशांमध्ये केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करण्याऐवजी संपूर्ण नेटवर्कवर कारवाई करण्यावर



## थेट मकोका लागणार

भर देण्यात आला आहे. उत्पादक, वित्तपुरवठादार, प्रमुख पुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक, घाऊक विक्रेते आणि किरकोळ विक्रेते यांची साखळी पुराव्यांच्या आधारे स्पष्ट करण्यात येणार आहे. संघटित स्वरूपाचे प्रकरण असल्यास उपलब्ध पुराव्यांच्या आधारे नेटवर्कमधील सर्व ओळख पटलेल्या अशा संघटीत कार्यरत सदस्यांविरुद्ध कारवाई करण्याचा दृष्टिकोन स्वीकारण्यात येईल. यामुळे प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या अवैध व्यापारातील मुख्य सूत्रधार व आर्थिक लाभार्थी यांना कायद्याच्या चौकटीत आणणे शक्य होईल.

**नियमित देखरेख कशी ठेवली जाईल?**

प्रत्येक जिल्ह्यात मकोका पात्रता, ऋखठ, आरोपपत्रे, न्यायालयीन आदेश, जप्ती, तपासाची स्थिती आणि अंतिम निकाल यांची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र अभियोजन नोंदवही ठेवण्यात येईल. राज्यस्तरावर मुख्यालयात एकत्रित नोंदवही ठेवण्यात येणार असून त्याद्वारे अशा प्रकरणांवर नियमित देखरेख ठेवली जाईल. सह आयुक्त स्तरावर जिल्हानिहाय अहवालांचा आढावा घेऊन प्रादेशिक अहवाल दरमहा आयुक्तांना सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.


मकोका लागू असलेल्या प्रकरणांत जामीन अर्जावर कायद्याप्रमाणे प्रभावी विरोध करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. मकोका अधिनियमातील कलम २१(७४) अंतर्गत जामिनासाठी कठोर दुहेरी अटी लागू होतात. त्यामुळे अशा प्रकरणांत शासकीय अभियोक्ता, पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन यांच्यात समन्वय ठेवून न्यायालयासमोर आवश्यक पुरावे व तथ्ये मांडली जातील याची खात्री अन्न व औषध प्रशासनाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी घ्यावयाचे निर्देश दिले आहेत.

या संपूर्ण कारवाईचा उद्देश नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे, प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या अवैध व्यापारामागील संघटित साखळी मोडीत काढणे, आर्थिक लाभासाठी सार्वजनिक आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कठोर कायदेशीर परिणामांना सामोरे जाण्यास भाग पाडणे आणि राज्यात प्रतिबंध आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे हा आहे. अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला किंवा इतर प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण किंवा विक्री होत असल्यास तत्काळ स्थानिक अन्न व औषध प्रशासन कार्यालय किंवा स्थानिक पोलीस यांना माहिती द्यावी.

**'कायद्याचे पालन करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्रास देण्यासाठी कारवाई नाही'**

तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे की, कायद्याचे पालन करणाऱ्या व्यापाऱ्यांना कोणताही त्रास देणे हा उद्देश नाही. मात्र, सार्वजनिक आरोग्यास हानी पोहोचवून संघटीत पद्धतीने प्रतिबंधित अन्नपदार्थांचा व्यापार करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि नेटवर्क्सविरुद्ध कठोर, पुराव्यांवर आधारित आणि कायदेशीरदृष्ट्या कठोर कारवाई केली जाईल. प्रतिबंधित अन्नपदार्थांचा अवैध व्यापार हा केवळ अन्नसुरक्षा उल्लंघन नसून, यापुढे तो सार्वजनिक आरोग्याविरुद्धचा गंभीर संघटित गुन्हा म्हणून हाताळला जाईल.

## !! हरवले आहेत !!



**राजाभाऊ रामचंद्र बोराडे (वय : ७१ वर्षे)**

सदर गृहस्थ, ५६० गणेश पेठ, साईबाबा मंदिरासमोर, पुणे येथील राहत्या घरापासून शुक्रवार, दिनांक ५ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता फिरायला गेले होते; ते पुन्हा आलेले नाहीत. ज्यांना कोणाला सापडतील त्यांनी कृपया डॉ. पुरुषोत्तम बोराडे ९८२२२६६९६१ यांच्या नंबरवर फोन करावा किंवा कोणत्याही पोलीस स्टेशनला त्याची माहिती द्यावी. योग्य ते बक्षीस दिले जाईल.

नाव : राजाभाऊ रामचंद्र बोराडे, वय : ७१ वर्षे, गोल चेहरा, काळे-पांढरे केस, दाढी-मिशी वाढलेली, चॉकलेटी रंगाची पॅन्ट, पांढऱ्या रंगाचा शर्ट, त्यावर काळ्या रंगाचे जॅकेट, दोन्ही हाताच्या बोटात चांदीच्या दोन अंगठ्या, डाव्या हातामध्ये घड्याळ, पायामध्ये निळ्या रंगाचे बूट, मोबाईल नाही. विस्मृती होत असते. अशा वर्णनाचा कोणी व्यक्ती आढळून आल्यास कृपया संपर्क करावा.

**डॉ.पुरुषोत्तम बोराडे : ९८२२२६६९६१**
**जगन्नाथ दरवेशी : ९२२२५ ०५१५२**
**जवाहरलाल पोळ : ९८१९४७४७८२**

# बोरीवर पुन्हा अन्याय; अपर तहसील कार्यालयाच्या मागणीसाठी ३ दिवस बाजार बंद

**अक्षराज : जाफर शेख**

**दि.१२, बोरी (परभणी) :** सुमारे २५ हजार लोकसंख्या असलेल्या बोरी गावासाठी मंजूर झालेले अपर तहसील कार्यालय बोरी येथे सुरू न करता चारठाणा येथे हलविण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ बोरीतील व्यापारी, शेतकरी, युवक, महिला तसेच विविध सामाजिक संघटनांनी तीन दिवस बोरी बाजार बंदचे आवाहन केले आहे.

बोरीचा प्रश्न हा केवळ एका शासकीय कार्यालयाचा नसून गावाच्या स्वाभिमानाचा, विकासाचा आणि भविष्यातील प्रगतीचा विषय असल्याचे नागरिकांचे मत आहे. अनेक वर्षांपासून बोरीला स्वतंत्र तालुक्याचा दर्जा, स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच अपर तहसील कार्यालय मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले आहेत. मंजुरी मिळाल्यानंतरही कार्यालय चारठाणा येथे हलविण्यात आल्याने बोरीकरांच्या भावनांना ठेच पोहोचल्याची भावना व्यक्त होत आहे.




बोरी हे जिंतूर तालुक्यातील महत्त्वाचे व्यापारी, शैक्षणिक व प्रशासकीय केंद्र असून बोरीला लागून सुमारे ५२ ते ५५ खेडी जोडलेली आहेत. या गावांतील हजारो नागरिक विविध शासकीय कामकाज, बँकिंग व्यवहार, शेतीविषयक कामे, आरोग्य सेवा तसेच दैनंदिन खरेदी-विक्रीसाठी बोरीवर अवलंबून आहेत. त्यामुळे अपर तहसील कार्यालय बोरी येथे सुरू झाल्यास परिसरातील नागरिकांची मोठी सोय झाली असती. मात्र कार्यालय दुसरीकडे हलविण्याच्या निर्णयामुळे नागरिकांना अतिरिक्त प्रवास, वेळ आणि आर्थिक खर्चाचा सामना करावा लागणार आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, बोरीच्या विकासाशी संबंधित प्रत्येक प्रश्नावर राजकीय स्वार्थाऐवजी गावाच्या हिताचा विचार होणे गरजेचे आहे. अनेक वर्षांपासून तालुक्याच्या मागणीसाठी संघर्ष सुरू असून आता अपर तहसील कार्यालयाच्या प्रश्नावरही बोरीकर एकवटले आहेत.

या आंदोलनास विविध व्यापारी संघटना, सामाजिक संस्था, युवक मंडळे व ग्रामस्थांचा पाठिंबा मिळत असून शासनाने तातडीने निर्णयाचा फेरविचार करून मंजूर अपर तहसील कार्यालय बोरी येथेच सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी बोरीकरांच्या भावना व्यक्त करताना अजय चौधरी म्हणाले, बोरीने आपल्याला खूप काही दिले आहे. आता बोरीचे देणे फेडण्याची वेळ आपली आहे. ही हक्काची लढाई आहे, स्वाभिमानाची लढाई आहे. बोरीला न्याय मिळेपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील.

# पारनेरच्या राजकारणात मोठा भूकंप; आ. दातेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत दिग्गजांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त माटुंगा, मुंबई येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित भव्य कार्यक्रमादरम्यान पारनेर तालुक्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडली. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत तालुक्यातील विविध पक्षांतील अनेक दिग्गज नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री धनंजय मुंडे, पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांचे उपस्थित संपन्न झाला.

या प्रवेशामध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, भाळवणी येथील उद्योजक शिवसेना शिंदे गटाचे संदिप रोहोकले, भाजपचे नगरसेवक अशोक चेडे, माजी उपनगराध्यक्ष दत्तात्रय कुलट, शिवसेनेचे उबाठा नगरसेवक नवनाथ सोबले, कांतीलाल ठाणगे, भाऊ ठुबे, माऊली औटी, सिद्धेश्वरवाडी माजी सरपंच आप्पासाहेब नरोडे तसेच योगेश दावभट, विकास केरूभाऊ रोहोकले, पवन संजय रोहोकले, उद्धव गुंजाळ, दिलीप विश्वनाथ रोहोकले, संदीप बिबिशन साळुंके, हरिदास रंगनाथ रोहकले, सुनिल बाबाजी चेमटे, मछिंद्र गोपाळा रोहोकले, संतोष भाऊसाहेब रोहकले, दत्ता कृष्णा सुरुसे, राहुल दादाभाऊ गुंजाळ, मनोहर विठ्ठल रोहोकले यांसह पारनेर शहर व तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.



पारनेर तालुक्यातील विविध राजकीय प्रवाहांतील प्रभावी नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची वाट धरल्याने स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः आगामी नगरपंचायत, ग्रामपंचायत आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेशाला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. या प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद आणखी वाढली असून तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

> आमदार काशिनाथ दाते सर यांची जनसामान्यांशी असलेली नाळ, विकासकामांबाबतची तळमळ आणि सर्वसमावेशक कार्यपद्धती यांच्यावर विश्वास ठेवून आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. आज तालुक्यातील नागरिकांमध्ये दाते सरांच्या कामाची सकारात्मक चर्चा असून त्यांच्या नेतृत्वाभोवती विश्वासाचे मजबूत वलय निर्माण झाले आहे. विकासाच्या राजकारणाला प्राधान्य देणाऱ्या या नेतृत्वासोबत काम करण्याचा निर्णय आम्ही घेतला असून आगामी काळात पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट होईल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे.
>
> **– संदीप रोहोकले, उद्योजक भाळवणी**




## कर्नाटकी कूटनीती

कर्नाटकात गेल्या तीन वर्षांपासून काँग्रेस अंतर्गत सुरू असलेला सत्तासंघर्ष सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याने तूर्तास संपुष्टात आला असून, डी. के. शिवकुमार हे आता कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री झाले आहेत. शिवकुमार यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात माजी पंतप्रधान देवेगौडा यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव करून केली होती. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये द्रमुकचे स्टॅलिन आणि तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांना आपली सत्ता टिकवता आली नाही, म्हणूनच कर्नाटकात आता तरी नेतृत्वबदल आवश्यक असल्याचे काँग्रेस पक्षश्रेष्ठींच्या लक्षात आले. यापूर्वी काँग्रेसला अंतर्गत गटबाजी व नेतृत्वाच्या संघर्षामुळे मध्य प्रदेश गमवावे लागले होते, तर राजस्थानमधील गेहलोत व पायलट यांच्यातील सत्तासंघर्ष मिटवताना पक्षाची मोठी दमछाक झाली होती. या अनुभवांच्या पार्श्वभूमीवर, कर्नाटकातील हा नेतृत्वबदल शांततेत आणि यशस्वीपणे घडवून आणण्यात तूर्तास काँग्रेस नेतृत्व यशस्वी ठरले आहे. शिवकुमार हे काँग्रेसचे रस्त्यावर लढणारे नेते म्हणून ओळखले जातात, तसेच ते पक्षाचे संकटमोचकदेखील मानले जातात. ते स्वतः वोक्कलिग समुदायाचे असले, तरी त्यांच्या प्रचंड आर्थिक साम्राज्यामुळे आणि वैयक्तिक प्रभावामुळे त्यांना राज्यभर मानणारा वर्ग हा जातीपलीकडचा आहे. भारताच्या राजकारणात मोठे बदल झाले आहेत. ९०च्या दशकात प्रभावी समजले जाणारे 'मंडल राजकारण' आता काहीसे बाजूला पडले असून, लालूप्रसाद यादव, एच. डी. देवेगौडा आणि नितीशकुमार यांच्या नेतृत्वाचा हा उतरता काळ आहे. अशा काळात सिद्धरामय्या यांच्या उपयुक्ततेचा काँग्रेसला निश्चितच फेरविचार करावा लागला. राज्यात काँग्रेसचा मुख्य सामाजिक आधार असलेले 'अहिंदा' (अल्पसंख्याक, मागासवर्गीय आणि दलित) हे सामाजिक समीकरण पुढील विधानसभा निवडणुकीत पक्षाला विजय मिळवून देण्यास पुरेसे ठरेल, असे काँग्रेसला वाटत नव्हते; म्हणूनच शिवकुमार यांची निवड केली गेली असावी. सध्या कर्नाटकात 'अडीच पक्षीय' राजकीय स्पर्धा अस्तित्वात आहे. यामध्ये भाजप आणि काँग्रेस हे दोन मुख्य राष्ट्रीय पक्ष एकमेकांचे थेट स्पर्धक आहेत. देवेगौडा यांचा जेडीएस हा प्रादेशिक पक्ष या दोघांच्या संघर्षात आपला राजकीय अवकाश शोधण्याच्या प्रयत्नात असतो. वास्तविक दक्षिण भारतात तमिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगण या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष स्वबळावर सत्तेत येतात; परंतु कर्नाटक त्यास अपवाद आहे. राष्ट्रीय राजकारणाचा प्रभाव येथे जाणवतो. तसेच या राज्यात तुलनेने सिने कलावंत राजकारणात कमी यशस्वी झालेले दिसतात; परंतु असे असले तरी काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांना येथील आपापल्या स्थानिक नेतृत्वास सोबत घ्यावे लागते. द्रविडी राजकारण व कन्नड भाषक अस्मिता हे मुद्दे कर्नाटकच्या राजकीय अवकाशात असले तरी या मुद्द्यांचा प्रभावदेखील येथे तुलनेने मर्यादित आहे.

कर्नाटक हे भाजपचे दक्षिणेकडील प्रवेशद्वार मानले जाते. जनता दलाचे रामकृष्ण हेगडे यांच्यासोबत युती करून भाजपने या राज्यात आपला राजकीय प्रवेश केला. त्यानंतर बी. एस. येडियुरप्पा यांच्या नेतृत्वामुळे तसेच लिंगायत समाजातील त्यांच्या लोकप्रियतेमुळे पक्षाला आपला जनाधार निर्माण करता आला. उत्तर कर्नाटकातील लिंगायत हा अत्यंत प्रभावशाली जातीसमुदाय असून या समुदायाच्या प्रभावास संस्थात्मक आधार देखील आहेत. दक्षिण कर्नाटकातील वोक्कलिग ही जात लिंगायत समाजाची मुख्य राजकीय स्पर्धक मानली जाते. जेडीएसचा मुख्य सामाजिक आधार देखील हा समाज मानला जातो.

भाजपसाठीदेखील हा नेतृत्वबदल एक मोठी संधी ठरू शकते. पश्चिम बंगालमध्ये मिळालेल्या अभूतपूर्व यशाच्या पार्श्वभूमीवर, भाजप कर्नाटकमध्ये पुढील निवडणुकीत काँग्रेस विरोधात जेडीएससोबत युती करून राजकीय संघर्ष करण्याची भूमिका स्वीकारू शकते. 'लिंगायत – वोक्कलिग' ही सामाजिक युती काँग्रेसला अडचणीत आणू शकते. म्हणूनच प्रस्थापितांचा विरोध असताना जातिनिहाय जनगणनेस काँग्रेसमधील एक गट उत्सुक नव्हता. येडियुरप्पा यांच्या सक्रिय राजकारणातील अनुपस्थितीमुळे भाजपला आता कोणत्याही एका लोकप्रिय चेहऱ्यावर अवलंबून न राहता सामूहिक नेतृत्वाच्या जोरावर शिवकुमार यांना पर्याय देण्याचा प्रयत्न करावा लागेल. अर्थात अजूनही येडियुरप्पा यांच्या मुलाकडे म्हणजे विजयेंद्र यांच्याकडे भाजपची मुख्य सूत्रे आहेत. शिवकुमार यांच्यासमोर मोठी राजकीय आव्हाने आहेत. मात्र, त्यांना मुख्यमंत्रिपदाचा मिळणारा कार्यकाळ दोन वर्षांपेक्षाही कमी असणार आहे. नव्या मंत्रिमंडळात एकीकडे गृहखात्याची विभागणी करण्यात आली आहे. तर दुसरीकडे रामलिंगा रेड्डी यांनी खातेवाटपावर नाराज होऊन आपल्या कॅबिनेट मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता; आता तो त्यांनी परत घेतला असला तरी यातून नव्या सरकारपुढील अडचणी अधोरेखित झाल्या आहेत.

**– डॉ.मनीष सोनवणे**

# पावसाच्या चाहुलीत पेरणीचे नियोजन : बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांची सज्जता

भारतीय कृषी व्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रगतीची अनेक शिखरे गाठली असली, तरी शेतीच्या बाबतीत पाऊस हा अजूनही सर्वांत महत्त्वाचा घटक मानला जातो. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात खरीप हंगामाची सुरुवात ही मान्सूनच्या आगमनाशी निगडित असते. जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागलेल्या असतात. काळे ढग दाटून येतात, वाऱ्यांची दिशा बदलते आणि वातावरणात ओलावा वाढू लागतो. ही केवळ ऋतूची चाहूल नसते, तर ती लाखो शेतकरी कुटुंबांच्या आशा-आकांक्षांची सुरुवात असते. बी-बियाण्यांच्या पिशव्या, नांगरलेली शेतजमीन, खतांची उपलब्धता आणि आर्थिक नियोजन या साऱ्या गोष्टी पावसाच्या वेळेवर आणि स्वरूपावर अवलंबून असतात. त्यामुळे पेरणीसाठी योग्य वेळ निश्चित करणे ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बाब ठरते.

सन २०२६ च्या खरीप हंगामाकडे पाहिले असता, हवामानातील बदल आणि मान्सूनच्या अनिश्चित स्वरूपामुळे शेतकऱ्यांसमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. भारतीय हवामान विभागाने यंदा मान्सून समाधानकारक राहण्याची शक्यता व्यक्त केली असली, तरी पावसाचे भौगोलिक वितरण, त्याची तीव्रता आणि कालावधी यामध्ये असमानता आढळण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही भागांत अतिवृष्टी, तर काही ठिकाणी दीर्घकालीन पावसाचा खंड अशा परिस्थितींना सामोरे जाण्याची तयारी शेतकऱ्यांना ठेवावी लागत आहे. त्यामुळे केवळ पाऊस सुरू झाला म्हणून पेरणी करण्याऐवजी, त्याची सातत्यता आणि जमिनीत साचणारी ओल यांचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक ठरते.

महाराष्ट्रातील खरीप हंगामात प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, भात, मका आणि बाजरी यांसारख्या पिकांची लागवड केली जाते. राज्यातील विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या विभागांमध्ये पर्जन्यमान आणि जमिनीचा प्रकार वेगवेगळा असल्याने पेरणीचा कालावधीही बदलतो. कोकणात जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी सुरू होते, तर मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाच्या नियमिततेनुसार जूनच्या उत्तरार्धात किंवा जुलैच्या प्रारंभी पेरणी केली जाते. कृषी तज्ज्ञांच्या मते, सलग काही दिवस पुरेसा पाऊस झाल्यानंतर जमिनीत आवश्यक ओल निर्माण झाल्यासच पेरणी करणे अधिक फायदेशीर ठरते. घाईघाईने केलेली पेरणी आणि त्यानंतर पडलेला पावसाचा खंड यामुळे दुबार पेरणीची वेळ येऊ शकते, ज्याचा थेट परिणाम उत्पादन खर्चावर होतो.

बदलत्या हवामानामुळे शेती क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्यांचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत आहे. तापमानातील वाढ, अवेळी पाऊस, गारपीट, दीर्घकाळ दुष्काळी परिस्थिती किंवा अचानक होणारी अतिवृष्टी या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम हा कृषी क्षेत्रावर होत असून, त्याचा फटका सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. शेतीमालाच्या उत्पादनात घट, रोग-किडींचे वाढते प्रमाण आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच डळमळीत होत आहे. त्यामुळे हवामानाशी सुसंगत शेती व्यवस्थापन विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे.

आजच्या काळात हवामानाचा अंदाज आणि कृषी नियोजन यांचा परस्परसंबंध अधिक दृढ झाला आहे. भारतीय हवामान विभाग, कृषी विद्यापीठे आणि कृषी विज्ञान केंद्रांकडून वेळोवेळी शेतकऱ्यांना हवामानविषयक सल्ला दिला जातो. मोबाईल संदेश, विविध ॲप्स, रेडिओ, दूरदर्शन आणि सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून हवामानविषयक माहिती सहज उपलब्ध होत आहे. तथापि, या माहितीचा उपयोग करून वैज्ञानिक पद्धतीने निर्णय घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे. हवामानाचा अंदाज, पिकांची निवड, पेरणीचा कालावधी आणि खत व्यवस्थापन यांचा योग्य समन्वय साधल्यास संभाव्य नुकसान टाळता येऊ शकते.

पेरणीपूर्व नियोजनामध्ये जमिनीची तयारी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. उन्हाळ्यात खोल नांगरट केल्यामुळे जमिनीतील कीड-रोगांचे नियंत्रण होण्यास मदत होते. तसेच पावसाचे पाणी जमिनीत अधिक प्रमाणात मुरते. शेतातील तणांचे व्यवस्थापन, बांधबंदिस्ती, चर खोदणे आणि मृदसंधारणाच्या उपाययोजना या गोष्टी वेळेत पूर्ण करणे आवश्यक असते. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्यासाठी शेततळी, जलसाठे आणि समतल चर यांचा उपयोग प्रभावी ठरू शकतो.

बियाण्यांची निवड करताना शेतकऱ्यांनी केवळ बाजारातील उपलब्धतेवर अवलंबून न राहता, स्थानिक हवामान आणि जमिनीच्या प्रकारानुसार शिफारस केलेल्या जातींची निवड करावी. कृषी विद्यापीठांनी विकसित केलेल्या सुधारित आणि रोगप्रतिकारक जातींचा अवलंब केल्यास उत्पादनवाढीस मदत होते. प्रमाणित बियाण्यांचा वापर, बीजप्रक्रिया आणि योग्य अंतर राखून पेरणी या बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. बियाण्यांचा दर्जा हा उत्पादनाच्या गुणवत्तेशी थेट संबंधित असल्याने, त्यामध्ये कोणतीही तडजोड करता कामा नये.

मृदा परीक्षण हे आधुनिक शेतीचे महत्त्वाचे अंग मानले जाते. जमिनीतील अन्नद्रव्यांची उपलब्धता, सामू, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण आणि इतर घटकांची माहिती मृदा परीक्षणाद्वारे मिळते. त्यानुसार खतांचा संतुलित वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होतो आणि जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवता येते. अनेकदा शेतकरी अंदाजाच्या आधारावर खतांचा वापर करतात, परिणामी अनावश्यक खर्च वाढतो. मृदा आरोग्य पत्रिकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतीने खत व्यवस्थापन करता येते.

शेती क्षेत्रात पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणे आज अत्यंत आवश्यक झाले आहे. पूर्वीचे शेतकरी स्थानिक हवामान, पक्ष्यांचे स्थलांतर, वाऱ्यांची दिशा आणि निसर्गातील बदल यांच्या आधारे शेतीचे नियोजन करीत असत. आज उपग्रह तंत्रज्ञान, हवामान अंदाज प्रणाली, ठिबक सिंचन, यांत्रिकीकरण आणि डिजिटल कृषी सेवा यांचा वापर करून अधिक अचूक नियोजन करता येत आहे. मात्र, या तंत्रज्ञानाचा लाभ लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

कृषी क्षेत्रातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाणही वाढत आहे. उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार, कर्जाचा बोजा आणि नैसर्गिक आपत्ती यांचा एकत्रित परिणाम त्यांच्या जीवनमानावर होत आहे. त्यामुळे शेती ही केवळ उत्पादनाची प्रक्रिया नसून, ती सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेशी निगडित बाब असल्याचे लक्षात घ्यावे लागेल. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि मानसिक आधार देण्याची जबाबदारी समाज आणि शासन या दोघांचीही आहे.

खरीप हंगामाच्या सुरुवातीला घेतलेले योग्य निर्णय संपूर्ण हंगामाच्या यशावर परिणाम करतात. पावसाचे आगमन, त्याची सातत्यपूर्ण नोंद, मृदेतील ओलावा आणि उपलब्ध संसाधने यांचा सखोल विचार करून पेरणी केल्यास संभाव्य जोखीम कमी करता येते. बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांची सज्जता ही केवळ तांत्रिक बाब नसून, ती दूरदृष्टी, शिस्त आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांची एकत्रित अभिव्यक्ती आहे.

आज गरज आहे ती शेतकऱ्यांपर्यंत योग्य माहिती वेळेत पोहोचविण्याची. कृषी विभाग, संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे आणि स्वयंसेवी संस्था यांनी समन्वयाने काम करून हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या शेती पद्धतींचा प्रसार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या अनुभवांना आणि स्थानिक ज्ञानाला आधुनिक विज्ञानाची जोड मिळाल्यास कृषी क्षेत्र अधिक सक्षम बनू शकते.

महाराष्ट्राच्या कृषी परंपरेने अनेक संकटांचा सामना करत प्रगतीचा मार्ग शोधला आहे. दुष्काळ, पूर, बाजारपेठेतील अनिश्चितता आणि बदलते हवामान या सर्व आव्हानांवर मात करत शेतकरी आजही नव्या आशेने पेरणीसाठी सज्ज होत आहे. पावसाच्या प्रत्येक सरीसोबत त्याच्या मनात नव्या स्वप्नांची पालवी फुटत असते. हीच जिद्द आणि कष्ट करण्याची तयारी महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीची खरी ताकद आहे.



**– डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२**

कृषी क्षेत्रातील बदलत्या वास्तवाचा विचार करता जलव्यवस्थापनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश असला, तरी पाण्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत अनेक भाग संवेदनशील आहेत. कोकणातील अतिवृष्टी आणि मराठवाडा-विदर्भातील दुष्काळी परिस्थिती हे विरोधाभासी चित्र राज्यात वारंवार पाहायला मिळते. अशा परिस्थितीत पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. शेततळी, बंधारे, समतल चर, शेतबांध, कंटूर बंडिंग, पाझर तलाव आणि जलसंधारणाच्या इतर उपाययोजनांमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर करता येतो. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करण्याची मानसिकता विकसित झाली, तर भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींमुळे पाण्याची बचत होण्याबरोबरच खतांचाही कार्यक्षम वापर शक्य होतो. विशेषतः फळबागा, भाजीपाला आणि नगदी पिकांसाठी या पद्धती अत्यंत उपयुक्त ठरतात.

खरीप हंगामात पीक संरक्षण हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे विविध रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. सोयाबीनवरील खोडमाशी, कापसावरील गुलाबी बोंडअळी, तुरीवरील शेंगा पोखरणारी अळी, भातावरील करपा रोग यांसारख्या समस्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. अशा वेळी एकात्मिक पीक संरक्षण व्यवस्थापनाचा अवलंब करणे आवश्यक ठरते. रोग आणि किडींची लक्षणे वेळेत ओळखणे, जैविक नियंत्रण साधनांचा वापर करणे, फेरपालट पद्धतीचा अवलंब करणे आणि आवश्यकता असेल तेव्हाच शिफारशीनुसार रासायनिक कीटकनाशकांचा वापर करणे, या उपाययोजनांमुळे पीक संरक्षण अधिक परिणामकारक बनते. अनेकदा जाहिरातींच्या प्रभावाखाली येऊन शेतकरी अवाजवी प्रमाणात औषधांचा वापर करतात. त्यामुळे उत्पादन खर्च वाढतो, पर्यावरणीय संतुलन बिघडते आणि मातीच्या गुणवत्तेवरही विपरीत परिणाम होतो. कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग्य निर्णय घेणे अधिक हितावह ठरते.

आजच्या काळात कृषी सल्लागारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे. कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, तालुका कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी आणि विविध संशोधन संस्था या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक माहिती उपलब्ध करून दिली जाते. मोबाईल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे हवामान अंदाज, बाजारभाव, रोग-किडींची माहिती आणि पीक व्यवस्थापनाचे सल्ले शेतकऱ्यांपर्यंत सहज पोहोचू लागले आहेत. तथापि, माहितीची विश्वासार्हता आणि तिचा योग्य वापर याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कृषीविषयक निर्णय घेताना प्रमाणित स्रोतांवर आधारित माहितीचा वापर करणे ही आजच्या शेतकऱ्याची गरज बनली आहे. शासनाच्या विविध योजनाही शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. प्रधानमंत्री पीक विमा योजना, मृदा आरोग्य पत्रिका योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कृषी यांत्रिकीकरण योजना आणि विविध राज्यस्तरीय अनुदान योजना यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. पीक विमा योजना ही नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देणारी महत्त्वाची योजना मानली जाते. मात्र, विमा नोंदणी, नुकसान भरपाईचे मूल्यांकन आणि दाव्यांच्या निकाली प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणि गती आणण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जाते. शासनाच्या योजना केवळ कागदोपत्री न राहता त्यांचा लाभ प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे.

शेतकऱ्यांसमोरील आर्थिक आव्हाने ही आज गंभीर चिंतेची बाब ठरली आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि इंधन यांच्या वाढत्या किमतींमुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. दुसरीकडे शेतीमालाला मिळणारा भाव अनेकदा अपेक्षेपेक्षा कमी असतो. बाजारपेठेतील चढ-उतार, मध्यस्थांची भूमिका आणि साठवणुकीच्या मर्यादित सुविधा यांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळण्यात अडचणी येतात. कर्जबाजारीपणा ही अनेक शेतकरी कुटुंबांसमोरील वास्तव परिस्थिती बनली आहे. अशा वेळी शाश्वत शेती व्यवस्थापन, उत्पादन खर्चात बचत आणि मूल्यवर्धनाच्या संधींचा शोध घेणे आवश्यक ठरते.

शेतीशी संबंधित सामाजिक आव्हानेही तितकीच गंभीर आहेत. ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर, शेतीकडे कमी होत चाललेला तरुणांचा कल, लहान होत जाणारी जमीनधारणा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे वाढते ओझे यांचा शेती क्षेत्रावर परिणाम होत आहे. आज अनेक शेतकरी कुटुंबांमध्ये महिलांचा शेतीतील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत विविध कामांमध्ये महिला महत्त्वाची भूमिका बजावत असल्या, तरी त्यांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहते. महिलांना प्रशिक्षण, आर्थिक सक्षमीकरण आणि निर्णय प्रक्रियेमध्ये समान सहभाग मिळणे आवश्यक आहे.

शेतकरी उत्पादक कंपन्या आणि स्वयं-सहाय्यता गट हे ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम ठरू शकतात. सामूहिक खरेदी, सामूहिक विक्री आणि तांत्रिक सल्ल्याच्या माध्यमातून लहान शेतकऱ्यांनाही स्पर्धात्मक बाजारपेठेत टिकून राहण्याची संधी मिळू शकते. एकट्याने संघर्ष करण्यापेक्षा समूहाच्या माध्यमातून पुढे जाण्याची मानसिकता विकसित होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील युवकांनी कृषी उद्योजकतेकडे वळल्यास शेती क्षेत्रात नवे बदल घडू शकतात.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक विविधीकरणालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. एकाच पिकावर अवलंबून राहण्याऐवजी विविध पिकांची लागवड, आंतरपीक पद्धती, पशुपालन, मत्स्यपालन आणि पूरक व्यवसायांचा अवलंब केल्यास उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण होऊ शकतात. त्यामुळे जोखीम कमी होते आणि आर्थिक स्थैर्य वाढण्यास मदत होते. पारंपरिक ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समन्वय साधून स्थानिक परिस्थितीनुसार शेती पद्धती विकसित करणे ही भविष्यातील गरज आहे.

पेरणीसाठी योग्य वेळ निश्चित करणे ही केवळ तांत्रिक बाब नसून ती शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित प्रक्रिया आहे. योग्य वेळी घेतलेला निर्णय उत्पादन वाढवू शकतो, तर चुकीच्या वेळेवर केलेली पेरणी मोठ्या आर्थिक नुकसानीस कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे हवामान अंदाज, जमिनीतील ओलावा, बियाण्यांची उपलब्धता आणि संसाधनांची तयारी या सर्व बाबींचा विचार करूनच पेरणी करणे आवश्यक आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, संयम आणि नियोजन या दोन गोष्टी खरीप हंगामातील यशस्वी शेतीचे मूलमंत्र आहेत.

महाराष्ट्रातील शेतकरी अनेक संकटांना तोंड देत असतानाही नव्या उमेदीने शेती करीत आहे. नैसर्गिक आपत्ती, आर्थिक अडचणी आणि सामाजिक बदल यांच्या छायेतही त्याची जिद्द अबाधित आहे. प्रत्येक खरीप हंगाम हा त्याच्यासाठी नव्या आशांचा, नव्या शक्यतांचा आणि नव्या संघर्षांचा प्रवास असतो. पावसाच्या पहिल्या सरी जमिनीला जशा नवसंजीवनी देतात, तशाच त्या शेतकऱ्यांच्या मनातही नव्या विश्वासाची पालवी फुलवतात.

आज आवश्यकता आहे ती शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून न पाहता, ती एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय जबाबदारी म्हणून स्वीकारण्याची. अन्नसुरक्षा, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य यांचा पाया शेतीवरच उभा आहे. शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी शासन, संशोधन संस्था, समाज आणि ग्राहक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या श्रमांचा सन्मान करीत त्यांना आवश्यक सुविधा, योग्य बाजारपेठ आणि तांत्रिक मदत उपलब्ध करून देणे ही काळाची मागणी आहे.

पावसाच्या चाहुलीत सुरू होणारे पेरणीचे नियोजन हे केवळ कृषी व्यवस्थापनाचे काम नसून ते भविष्य घडविण्याचे कार्य आहे. बदलत्या वातावरणाशी जुळवून घेत, नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करीत आणि पारंपरिक ज्ञानाची सांगड घालत महाराष्ट्रातील शेतकरी अधिक सक्षम होऊ शकतो. संकटे कितीही मोठी असली, तरी नियोजन, दूरदृष्टी आणि सामूहिक प्रयत्न यांच्या बळावर त्यांच्यावर मात करता येते. शेवटी, योग्य नियोजन, हवामानाची अचूक माहिती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्या आधारे शेतकरी संकटांवर मात करू शकतो, हा विश्वास अधिक दृढ करण्याची हीच वेळ आहे. कारण शेतकऱ्याचा आशावाद, त्याची जिद्द आणि श्रमशीलता यांच्याच बळावर देशाची अन्नसुरक्षा आणि समृद्धी अवलंबून आहे.

## दान पेटी

मंदिरी जागोजागी
ठेवतात दान पेटी
दान करतो अर्पण
भक्तीभावना पोटी

नवस बोलून देवा
धरतात कुणी वेठी
दिल्याने देव प्रसन्न
बुध्दीआमची थिटी

देवाचे जगत अवघे
तो उभा भक्तापाठी
अर्पण करी आपण
स्व समाधाना साठी

भावाचा तो भुकेला
तया नको उंचीभेटी
भरभरुन दान देतो
करतो उगाचं दाटी

नावआपले झळको
रे दान शूरता खोटी
कुणी दावे बडेजाव
केवळ प्रसिद्धीपोटी

समाजकार्ये करावी
ती उघडून दानपेटी
गरजू दीन गरीबांना
भोजन कपडे वाटी

**– बबन दामोदर गुळवे**
**लातूर मो.९७३०९३९७३२**

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नवीन पनवेल गणेश मार्केट मधील अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, पनवेल :** महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार प्रभाग समिती 'ड' अंतर्गत नवीन पनवेल येथील गणेश मार्केट परिसरातील अनधिकृत टपऱ्यांवर १० जून रोजी कारवाई करण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे तसेच उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रूपाली माने आणि प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण विभागाचे कर्मचारी तसेच एमएसएफ सुरक्षारक्षक यांच्या पथकाच्या माध्यमातून कारवाई करण्यात येत होती. दरम्यान यावेळी संबंधित अनधिकृत टपरीधारकांकडून कारवाईस विरोध करण्यात आला.

अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या टपऱ्या व अतिक्रमणांविरुद्ध महानगर पालिका नियमितपणे कारवाई करत असून, कारवाईदरम्यान विरोध करणाऱ्या संबंधितांवरही नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शहरातील रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## १ ऑगस्टपासून महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला असून आज अखेर राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डेही लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत.

दरम्यान, स्मार्ट कार्डच्या वितरणामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले आहे.

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, तिकीट वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि प्रवास व्यवस्थापन अधिक आधुनिक व्हावे, या उद्देशाने स्मार्ट कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी १ ऑगस्टपूर्वी आपले स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते कार्यान्वित करून घ्यावे, असे आवाहन परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.

## जिल्ह्याचे नाव उज्वल करणाऱ्या हिंदवी चौरेला आर्थिक मदतीची गरज



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१२, केज :** केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील कु.हिंदवी परमेश्वर चौरे हिने अहमदाबाद येथे झालेल्या वर्ल्ड योगासना चॅम्पियनशिपमध्ये दोन सुवर्णपदके पटकावून भारताचा तिरंगा अभिमानाने उंचावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे बीड जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले आहे. मात्र, अशा गुणवंत खेळाडूला पुढील वाटचालीसाठी आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

हिंदवी चौरे हिच्या या यशाबद्दल केज शहरातील सक्रिय पत्रकार भवन येथे सक्रिय पत्रकार संघ, केज यांच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष गालफाडे, माजी अध्यक्ष डी. डी. बनसोडे, अधिस्वीकृती पत्रकार महादेव गायकवाड, पत्रकार हनुमंत सौदागर, इकबाल शेख यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुश इंगळे, जीवन शिक्षण मंडळाचे सचिव जी. बी. गदळे, तालुका क्रीडा समन्वयक विनोद गुंड आणि चंद्रकांत पाटील यांनीही हिंदवीचा सत्कार करून तिच्या यशाबद्दल अभिनंदन केले.

दरम्यान, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुश इंगळे यांनी हिंदवी चौरे हिला पुढील स्पर्धांच्या तयारीसाठी आणि प्रोत्साहन म्हणून ११ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली. त्यांच्या या मदतीबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

जागतिक स्तरावरील स्पर्धेत दोन सुवर्णपदके जिंकून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या हिंदवी चौरे हिच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रशिक्षण, प्रवास व इतर खर्चासाठी मोठ्या आर्थिक पाठबळाची आवश्यकता असते. त्यामुळे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन हिंदवीला आर्थिक मदत करावी, अशी अपेक्षा तिच्या पालकांनी व्यक्त केली.

# उमराठचा सुपुत्र ओंकार आंबेकर याची मुंबई पोलिस सेवेत निवड

## ग्रामपंचायत उमराठ व उमराठ गावातर्फे सन्मानित



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१२, उमराठ (गुहागर) :** गुहागर तालुक्यातील उमराठ खुर्द आंबेकरवाडीचा सुपुत्र ओंकार रेणुका दामोदर आंबेकर याची नुकतीच मुंबई पोलीस सेवेत नियुक्ती झाल्यामुळे ग्राम पंचायत उमराठ व उमराठ गावातर्फे शुक्रवार दि. १२ जून २०२६ रोजी विशेष ग्रामसभेत ग्रामपंचायत उमराठचे विद्यमान प्रशासक जनार्दन आंबेकर यांच्या हस्ते तर उमराठ ग्रामस्थां तर्फे गावचे मानकरी अनिल पवार व पंचायत समिती सदस्य संदीप गोरिवले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन ओंकार याचा सन्मान करण्यात आला.

पोलीस सेवेत जाण्यासाठी पुर्वी कोकणातील मुले फारसी उत्साही नसायची. सद्या सुशिक्षित बेरोजगारी एवढी वाढली आहे की, मुलांना सरकारी नोकरी मिळणे कठीण झाले आहे. किंबहुना सद्या पोलीस भरती सोडली तर इतर क्षेत्रात भरतीच होताना दिसत नाही. शेवटी जिथे पर्याय उपलब्ध होतो तिथे तरूण युवा-युवती प्रयत्न करतात. अशाच प्रयत्नातून सद्या कोकणातील अनेक युवा-युवती पोलीस भरतीत पदार्पण करत आहेत. सद्या पोलीस सेवेत पदार्पण करणाऱ्या कोकणातील युवा-युवतींचे निश्चितच अभिनंदन करायला हवे. उमराठ गावातील ओंकार दामोदर आंबेकर या तरूण तडफदार युवकाची सुद्धा अशाच प्रक्रियेतून पुढे जात मुंबई पोलीस सेवेत निवड झाली आहे.

प्रसंगी ओंकार रेणुका दामोदर आंबेकर याने आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, माझी पुर्वी पासून म्हणजेच शालेय जीवना पासून इच्छा होती की, मी पोलीस सेवेत समाज सेवेसाठी जावे. मी त्याच्या साठी भरपूर प्रयत्न केले. परंतू त्या साठी कोणताही कोचिंग क्लास किंवा अकॅडेमीत फि भरून ॲडमिशन घेतले नाही. मैदानावर नियमित व्यायामा बरोबरच धावणे, गोळा फेक व उंच उडी सारखे मैदानी प्रत्यशिकांचा सतत सराव केला. तर लायब्ररीत बसून बौद्धीक चाचणी परीक्षेचा अभ्यास केला. माझी एक/दोन वेळा प्रयत्न करून सुद्धा संधी हुकली. परंतू मी माझी जिद्द सोडली नाही. अखेर या वेळच्या मुंबई पोलीस भरतीत माझी निवड झाली. मी पुर्ण समाधानी असून मी माझ्या कर्तव्यातून समाज सेवा करण्यास उत्सुक आहे.

उमराठ गावातर्फे उमराठचे प्रशासक जनार्दन आंबेकर, गुहागर पंचायत समितीचे सदस्य संदीप गोरिवले आणि उमराठचे मानकरी अनिल पवार यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.सदर विशेष ग्रामसभेत ग्रामपंचायत वार्ड आरक्षण सोडतीसाठी आलेले कृषी अधिकारी सुजय कुतळकर, हेदवी सजाचे ग्राम महसूल अधिकारी सुशिल परिहार, पंचायत समिती सदस्य संदीप गोरिवले आणि मोठ्या प्रमाणात पुरूष व महिला ग्रामस्थ उपस्थित होते.सदर कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत कर्मचारी नितीन गावणंग, प्रशांत कदम, साईस दवंडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ओंकार आंबेकर याचे पोलीस सेवेत निवड झाल्याबद्दल उमराठ पंचक्रोशीसह तालुक्यातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

# बल्लारपुरात दोन विविध घटनेत ३ तलवारी व दुचाकीसह ५ जण ताब्यात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, बल्लारपूर (चंद्रपूर) :** शहरात लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने तलवारी बाळगून फिरणाऱ्या तरुणांविरुद्ध बल्लारपूर पोलिसांनी धडक कारवाई करत दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत तीन लोखंडी तलवारी आणि एक दुचाकी जप्त करण्यात आली असून आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर कारवाई ९ जून रोजी करण्यात आले. पहिली कारवाई गणपती विसर्जन घाट परिसरात करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार काही युवक काळ्या रंगाच्या दुचाकीवर फिरत तलवारींच्या जोरावर परिसरात दहशत निर्माण करीत असल्याची माहिती मिळाली होती.

ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये कृष्णा संग्राम बहुरिया (१८), कार्तिक विनोद माहेश्वरी (१८) दोन्ही रा. सरदार पटेल वॉर्ड आणि रोहित राजा बहुरिया (१८), रा. आंबेडकर वॉर्ड बल्लारपूर यांचा समावेश आहे. झडती दरम्यान कृष्णा व कार्तिक यांच्या ताब्यातून दोन लोखंडी तलवारी तर रोहितच्या ताब्यातील काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर दुचाकी जप्त करण्यात आली. पोलिसांनी पंचनामा करून सुमारे ३१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

दरम्यान, त्याच दिवशी छठ पूजा घाट वस्ती परिसरातही अशाच प्रकारची दुसरी कारवाई करण्यात आली. येथे तलवार बाळगून फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सन्नी सुरेश मंथनवार (१९) रा. आंबेडकर वॉर्ड याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने एका भिंतीमागे लपवून ठेवलेली लोखंडी तलवार काढून दिली. या प्रकरणात एका विधी संघर्षग्रस्त बालकालाही ताब्यात घेण्यात आले आहे. दोन्ही घटनांमध्ये आरोपींकडून धारदार शस्त्रे बाळगून सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असून त्यांच्याविरुद्ध कलम ४ व २५ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. सदर कारवाई पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश जोगदंड सह गुन्हे शाखेच्या पथकाने केले.

# कर्जत रेल्वे पोलिसांनी लोकलमधील चाकू हल्ल्याचा अवघ्या १२ तासांत लावला छडा



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.१२, कर्जत (रायगड) :** सीएसएमटी-खोपोली लोकलमधील प्रवाशावर चाकूने हल्ला करून मारहाण करणाऱ्या आरोपींचा शोध घेत कर्जत रेल्वे पोलिसांनी अवघ्या १२ तासांत गंभीर गुन्ह्याचा उलगडा करत दोन आरोपींना अटक केली आहे. रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कारवाई उल्लेखनीय मानली जात असून, पोलिसांच्या तत्परतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सतीश कुमार बोलामनी पाठक (वय २६, रा. मस्जिद बंदर, मुंबई) हे गुरुवारी (दि.११ जून) सकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या सुमारास भायखळा रेल्वे स्थानकावरून सीएसएमटी-खोपोली लोकलच्या सीएसएमटी बाजूकडील लगेज डब्यातून प्रवास करत होते. दरम्यान, लोकल वांगणी रेल्वे स्थानक ओलांडल्यानंतर सीटवर बसण्याच्या किरकोळ कारणावरून काही तरुणांशी त्यांचा वाद झाला.नंतर या वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले असून, आरोपींनी फिर्यादीच्या पोटात चाकूने वार करून गंभीर दुखापत केली. तसेच हाताने मारहाण व शिवीगाळ केल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी कर्जत रेल्वेपोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(२), ११५(२), ३५२ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.फिर्यादीच्या तक्रारीनुसार दुपारी तपासाची सूत्रे हलताच कर्जत रेल्वे पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कड आणि गुन्हे शोध पथकाने उल्हासनगर, शेलू, नेरळ रेल्वे स्थानकांसह नेरळ शहरातील विविध भागांतील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी केली. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा माग काढत नेरळमधील ममदापूर परिसरातून दोन संशयितांना घेतले. ताब्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे इब्रान इद्रिस अन्सारी (वय १८, रा. नेरळ, ता. कर्जत) आणि करण कन्हैयालाल अग्रवाल (वय २२, रा. शेलू, ता. कर्जत) अशी आहेत. दोघांना चौकशीअंती रात्री ९.२५ वाजता अटक करण्यात आली आहे

दरम्यान, या गुन्ह्यातील आणखी एक आरोपी सिद्धार्थ गायकवाड (रा. नेरळ) हा फरार असून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.गंभीर स्वरूपाचा हा गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १२ तासांत आरोपींना अटक करण्यात कर्जत रेल्वे पोलिसांना यश आल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे. रेल्वे प्रवाशांमध्येही या कारवाईमुळे सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त राकेश एम. कलासागर, पोलीस उपआयुक्त प्रज्ञा जेडगे, सहाय्यक पोलीस आयुक्त नंदराज पाटील तसेच कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत पीएसआय भाऊसाहेब कुरुंद, गुन्हे तपास पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कड, पोलीस हवालदार प्रवीण कांबळे, हमीद शेख, सचिन चव्हाण तसेच पोलीस अंमलदार नितीन मोहिते, चोरमले, श्रीकांत जाधव, प्रवीण मुलमुले आणि अक्षय पेरणेकर यांनी विशेष मोलाची कामगिरी बजावली.

# नैताळेत मध्यरात्री दरोडेखोरांचा धुमाकूळ! वृद्ध दाम्पत्याला मारहाण करत दागिने व रोकड लंपास



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, नैताळे (नाशिक) :** निफाड तालुक्यातील नैताळे येथे आज, शुक्रवार (दि. १२ जून) रोजी मध्यरात्री अज्ञात दरोडेखोरांनी एका घरात घुसून वृद्ध दाम्पत्याला क्रूरपणे मारहाण करत सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या धाडसी दरोड्यामुळे नैताळे आणि परिसरात तीव्र खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**दरवाजा तोडून घरात प्रवेश :** मिळालेल्या माहितीनुसार, नैताळे येथील गाजरवाडी रोड परिसरात साहेबराव शिवराम तुपलोंढे हे आपल्या पत्नीसह राहतात. शुक्रवारी मध्यरात्री सुमारे पावणेतीन वाजेच्या सुमारास चार अज्ञात दरोडेखोरांनी त्यांच्या घरावर डल्ला मारला. दरोडेखोरांनी घराच्या मुख्य दरवाजाचा कोंडा तोडून स्वयंपाकघराच्या बाजूने आत प्रवेश केला.

**वृद्ध दाम्पत्याला मारहाण आणि लूट :** घरात अचानक आवाज आल्यामुळे तुपलोंढे दाम्पत्याला जाग आली. यावेळी चौघांपैकी तिघेजण घरात घुसले होते, तर एक जण बाहेर थांबून पाळत ठेवत होता. डोळ्यांसमोर दरोडेखोर पाहून वृद्ध दाम्पत्य प्रचंड घाबरले. चोरट्यांनी कोणतीही दया न दाखवता दोघांनाही मारहाण केली आणि घरातील सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम बळजबरीने हिसकावून घेऊन पोबारा केला.

**वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची घटनास्थळी धाव :** घटनेची माहिती मिळताच निफाड पोलिसांनी तातडीने पावले उचलली. पोलीस उपअधीक्षक कांतीलाल पाटील आणि पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्यासह पोलिसांचे मोठे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून विविध पुरावे संकलित केले आहेत.

**श्वानपथका पाचारण; तपासासाठी विशेष पथके रवाना :** आरोपींचा माग काढण्यासाठी पोलिसांनी तत्परता दाखवत तात्काळ श्वानपथकाला (Dog Squad) पाचारण केले होते. श्वानपथकाच्या मदतीने परिसराची कसून तपासणी करण्यात आली. दरोडेखोरांना जेरबंद करण्यासाठी निफाड पोलिसांनी विशेष तपास पथके तयार केली असून, संशयितांच्या शोधासाठी वेगवेगळ्या भागात रवाना केली आहेत.

**रात्रीची गस्त वाढवण्याची नागरिकांची मागणी :** या थरारक दरोड्याच्या घटनेमुळे नैताळे परिसरात नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भयभीत झालेल्या ग्रामस्थांनी परिसरात रात्रीच्या वेळी पोलीस गस्त (पेट्रोलिंग) वाढवण्याची आग्रही मागणी केली आहे. दरम्यान, 'पोलिसांकडून विविध बाजूंनी तपास सुरू असून लवकरच आरोपी गजाआड होतील,' असा विश्वास पोलीस प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

अक्षराज



# पारनेर तालुक्यातील सार्वजनिक तलावातून बेकायदा पाणी उपसा करणाऱ्यांवर लगाम

## मांडओहळ धरण परिसरात पाणी उपशावर कडक निर्बंध



सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून ५०० मीटर अंतरात कोणत्याही कारणासाठी नवीन विहीर खोदण्यास सक्त मनाई. पिण्याच्या स्रोतावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या विहिरींमधून पाणी काढण्यास मनाई. सार्वजनिक पाणी स्रोतांपासून एक किलोमीटर परिसरातील विहिरी तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याचे आदेश. जलस्रोतांचे संरक्षण करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपवली आहे.

---

सध्या पावसाची अनिश्चितता आणि उपलब्ध पाणीसाठा यांचा ताळमेळ घालणे अत्यंत गरजेचे आहे. तालुक्यातील २९ गावांची तहान याच परिसरातील पाण्यावर भागवली जात आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन प्रशासनाने हे निर्बंध लागू केले आहेत. नागरिकांनी सहकार्य करून १४ जूनपर्यंत आपली खाजगी साधने हटवावीत अन्यथा १५ जूननंतर कारवाईत कुणाचीही गय केली जाणार नाही,थेट साहित्य जप्ती व गुन्हे दाखल करण्याची कारवाई केली जाईल.

**- तहसीलदार व गटविकास अधिकारी, पारनेर**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील सर्व गावातील सार्वजनिक तलावातून तसेच कर्जुले हर्या आणि मांडओहळ धरण परिसरात तीव्र पाणीटंचाई घोषित करण्यात आली असून, पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाने खासगी पाणी उपशावर कडक निर्बंध लादले आहेत.

नागरिकांनी व शेतकऱ्यांनी १४ जूनपुर्वी आपल्या इलेक्ट्रिक मोटारी आणि पाईप्स स्वतःहून काढून घ्यावेत; अन्यथा १५ जून नंतर हे साहित्य जप्त करून संबंधितांवर थेट गुन्हे दाखल केले जातील, असा सज्जड इशारा प्रशासनाने दिला आहे.

श्रीगोंदा-पारनेरच्या उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, या परिसरात 'महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९' मधील तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत. सध्या मांडओहळ धरणात केवळ मृत पाणीसाठा शिल्लक आहे. तरीही या परिसरातील खासगी बोअरवेल आणि विहिरींच्या माध्यमातून तालुक्यातील तब्बल २९ टंचाईग्रस्त गावांना ३० टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन प्रशासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

केवळ मांडओहळ धरण परिसरच नाही, तर तालुक्यातील सर्व गावांमधील सार्वजनिक तलाव आणि इतर उपलब्ध पाणी स्रोतांमधील खासगी पाणी उपसा साधने हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शासकीय पाणीपुरवठा योजना आणि मंजूर सहकारी संस्था वगळता इतर कोणतीही साधने (मोटारी, पाईप्स) आढळल्यास ती जप्त करून कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कर्जमाफीच्या जाचक अटींविरोधात खा.लंके आक्रमक

## २३ जूनला सर्वपक्षीय शेतकरी संघटनेचे आंदोलन; मुख्यमंत्र्यांना निवेदन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कृषी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, तसेच शेतकरी हिताच्या विविध मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा २३ जून रोजी पारनेर तालुक्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शेतकरी, सामाजिक व सर्वपक्षीय संघटनांनी दिला आहे.



यासंदर्भात खासदार लंके यांनी गुरुवारी तहसीलदार गायत्री सैंदाने यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे निवेदन सादर केले. या निवेदनात कर्जमाफी योजनेतील विविध अटींमुळे मोठ्या संख्येने शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याची बाब अधोरेखित करण्यात आली आहे. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात जाहीर झालेल्या योजनेत अनेक निर्बंध घालण्यात आल्याने शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनात सन २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेतील मर्यादा हटविणे, १२ लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांवरील अटी रद्द करणे, प्रोत्साहनपर अनुदानासाठीची दोन वर्षे नियमित कर्जफेडीची अट हटविणे, पीकविमा योजनेतील जाचक ट्रिगर अटी रद्द करणे आणि खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांचे पुनर्गठन करण्याच्या मागण्यांचाही समावेश आहे. याशिवाय पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजी गॅसच्या वाढत्या दरांमध्ये कपात करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, पारनेर तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत शेतकरी प्रश्नांवर सर्वपक्षीय संघटना एकवटल्याचे चित्र पाहायला मिळाले. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २३ जून रोजी पारनेर तालुक्यातील सर्व प्रमुख रस्ते बंद करून रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असाही इशारा यावेळी देण्यात आला.

# काँग्रेस भवनात उमेश राजेनिंबाळकर यांचा भव्य पदग्रहण सोहळा; संघटन बळकटीचा निर्धार

**अक्षराज : संगिता वनकळस**

**दि. १२, धाराशिव :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर उमेश राजेनिंबाळकर यांचा पदग्रहण सोहळा धाराशिव शहरातील काँग्रेस भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. जिल्हाभरातील काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध आघाड्यांचे प्रतिनिधी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा दिमाखात संपन्न झाला.

पदग्रहण सोहळ्यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नानासाहेब पाटील, माधव कुतवळ, प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार, विश्वास शिंदे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, प्रदेश सचिव डॉ.नवगिरे, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव अभिजित चव्हाण, शिला उंबरे, प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर, पांडुरंग कुंभार, राजाभाऊ शेरखाने, मधुकर बिद्री, प्रशांत पाटील, खलील सय्यद, नानाभाऊ भोसले, महेबूब पटेल, विनोद वीर, विलास शाळु, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा गोदावरी केंद्रे, अर्जुन बिराजदार, सर्फराज काजी, धनंजय राऊत, अग्निवेश शिंदे, शिवाजी गायकवाड, विजय वाघमारे, तोडकर, अशोक बनसोडे, गपाट, रुपेश शेंडगे, अमोल कुतवळ, बापू हरकर, सत्तार शेख, नगरसेवक अझर पठाण, बापू शेळके, ॲड. गणपती कांबळे, आयुब पठाण, अभिमान पेठे, अंकुश पेठे, मुहिब शेख, मौलाना शौकत, लक्ष्मीकांत खटके, बालाजी हूबाळे, नगरसेवक इम्रान शेख, राजुदास आडे, दत्ता तांबे, संकेत पडवळ, गणेश पवार, भूषण देशमुख, अभिषेक बागल, मोईज शेख, मोईज सय्यद, विजय दळगडे, आबेदिन कुरेशी, धीरज सोनवणे, जावेद काझी, जीवन चौगुले, दिगंबर गायकवाड, गहिनीनाथ सोनटक्के, चंद्रकांत जाधव, ॲड. सिराज मोगल, ॲड. मुशरफ सय्यद, समी काझी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.




यावेळी उपस्थित मान्यवरांनी उमेश राजेनिंबाळकर यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. वक्त्यांनी आपल्या मनोगतात काँग्रेस पक्षाची विचारधारा, संघटनात्मक मजबुती आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याची गरज व्यक्त केली. पदग्रहणानंतर बोलताना जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांनी पक्षश्रेष्ठींनी आपल्यावर टाकलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मानाने सोबत घेऊन काँग्रेसची संघटना गावागावात अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले. शेतकरी, कामगार, युवक, महिला, व्यापारी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर काँग्रेस पक्ष आक्रमकपणे भूमिका मांडेल व जनतेच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करेल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. धाराशिव जिल्ह्यात काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविणे, नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे आणि पक्षाची भूमिका प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविणे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. पक्षातील सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनातून जिल्ह्यात काँग्रेसला अधिक बळकटी मिळवून देण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# रस्त्यावर थुंकणाऱ्याला जाब विचारणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करा; मनसेची ठामपाकडे मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१२, ठाणे :** स्वच्छ ठाणे, सुंदर ठाणे या मोहिमसाठी पुढाकार घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाचा महापालिकेने स्वच्छतादूत म्हणून गौरव करावा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली आहे. मनसेचे सरचिटणीस संदीप दिनकर पाचंगे यांनी ठाणे महापालिका आयुक्तांना पत्र देऊन ही मागणी केली आहे.


महाराष्ट्र नवनिर्माण सेना
संदीप दिनकर पाचंगे
ठाणे महानगरपालिका, ठाणे. मुख्य कार्यालय
11 JUN 2026
दिनांक: ११.०६.२०२६
प्रति,
मा. आयुक्त साहेब
ठाणे महानगरपालिका,
ठाणे.
जय महाराष्ट्र!!!
संदीप दिनकर पाचंगे

**नेमकं प्रकरण काय?**

९ जून २०२६ रोजी सायंकाळी विवियाना मॉल समोर एका कार चालकाने रस्त्यावर थुंकले. यावेळी तेथे उपस्थित असलेल्या एका जबाबदार ज्येष्ठ नागरिकाने त्या चालकाला जाब विचारला. मात्र, चूक मान्य करण्याऐवजी चालकाने त्या ज्येष्ठ नागरिकाला मारहाण केली. शहराच्या स्वच्छतेसाठी धाडस दाखवणाऱ्या त्या नागरिकाचा हा प्रसंग मन हेलावणारा आहे.

**मनसेची भूमिका :-**

संदीप पाचंगे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, ठाणे शहर एकेकाळी स्वच्छ शहर म्हणून गौरवले गेले होते. ही ओळख टिकवण्यासाठी अशा स्वच्छतादूतांनी पुढे येणे गरजेचे आहे. प्रशासनाला मदत करणाऱ्या नागरिकांना सुरक्षित वातावरण देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे.

**मनसेच्या प्रमुख मागण्या :-**

१. ज्येष्ठ नागरिकाचा सन्मान : रस्त्यावर थुंकणाऱ्याला रोखणाऱ्या त्या ज्येष्ठ नागरिकाचा महापालिकेने स्वच्छतादूत म्हणून जाहीर सन्मान करावा.

**२. कारवाईची मोहीम कठोर करा :** रस्त्यावर थुंकणे, कचरा टाकणे यांसारख्या प्रकारांवर दंडात्मक कारवाईची मोहीम अधिक तीव्र करावी.

३. नागरिकांना संरक्षण : स्वच्छतेसाठी पुढाकार घेणाऱ्या नागरिकांना मारहाणीसारखे प्रकार होणार नाहीत, यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावे.

या जबाबदार ज्येष्ठ नागरिकाने दाखवलेले धाडस त्यांचे ठाणे शहरावरील प्रेम दर्शवते. अशा नागरिकांमुळेच ठाणे स्वच्छ राहील, असे पाचंगे यांनी पत्रात नमूद केले आहे. या घटनेमुळे स्वच्छतेसाठी लढणाऱ्या सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून मनसेच्या मागणीनंतर ठामपा काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# थोडक्यात

## कासा-चारोटी बंद; तरुणीच्या विनयभंग प्रकरणाचा निषेध, आरोपीला अटक

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१२, कासा (पालघर) :** डहाणू तालुक्यातील कासा परिसरात एका २० वर्षीय तरुणीच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याच्या घटनेमुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी कासा व चारोटी परिसरातील व्यापारी, दुकानदार आणि नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला. दरम्यान, पोलिसांनी आरोपीला अटक करून पुढील तपास सुरू केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १२ जून रोजी पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास पीडित तरुणी आपल्या राहत्या घरी झोपलेली असताना आरोपी इजाज नवाब खाटीक (वय ३१, रा.बराडपाडा, कासा) याने घरात प्रवेश करून तिचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. पीडित तरुणीने आरडाओरड केल्यानंतर परिसरातील महिला व नागरिक घटनास्थळी धावून आले. त्यांनी आरोपीला पकडून चांगलाच चोप दिल्यानंतर पोलिसांच्या ताब्यात दिल्याची माहिती स्थानिकांकडून मिळाली.

या प्रकरणी कासा पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ११५/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी समीर मेहेर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच पोलीस निरीक्षक अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी डहाणू परिसरात घडलेल्या एका वादग्रस्त प्रकरणामुळे नागरिकांमध्ये आधीच अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर आता कासा येथे घडलेल्या या घटनेमुळे महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही महिलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. घटनेच्या निषेधार्थ कासा व चारोटी परिसरातील अनेक व्यापाऱ्यांनी दुपारनंतर आपली दुकाने बंद ठेवली. नागरिकांनी आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी करत महिलांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली. या घटनेमुळे कासा परिसरात तणावपूर्ण शांतता असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण कायम आहे. पोलिस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक खबरदारी घेतली असून प्रकरणाचा सखोल तपास सुरू असल्याचे सांगितले आहे.

## दिव्यांगासाठी मोफत कृत्रिम अवयव वाटप शिबिर

### ७५ लाभार्थ्यांना लाभ - आ.देवतळे यांचे आवाहन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** भारत सरकारच्या एडीआयपी योजनेअंतर्गत एलिम्को व एस.आर. संस्थेमार्फत दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधन वाटप शिबिर स्थानिक पंचायत समिती सभागृहात ११ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले. या शिबिरात ७५ दिव्यांगानी प्रत्यक्ष लाभ घेतला.

आ.करण देवतळे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थान वरून बोलताना आ.देवतळे म्हणाले,'कृत्रिम अवयव आणि सहाय्यभूत साधनांच्या माध्यमातून दिव्यांगांचा आत्मविश्वास वाढविण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यांना स्वाभिमानाने जीवन जगता यावे यासाठी शासनाच्या विविध योजना दिव्यांगापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे,' सुरुवातीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेला मालार्पण करुन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. शिबिरात तज्ञ डॉक्टरांमार्फत दिव्यांग व्यक्ती व कॅलिपर्सची गरज असणाऱ्या ७५ जणांची प्रत्यक्ष तपासणी व मोजमाप करण्यात आले. यावेळी कृत्रिम हात, पाय, कॅलिपर्स यासारख्या आवश्यक सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले. भद्रावती तालुक्यातील एकूण १४२ दिव्यांग या शिबिराला उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी आशुतोष सपकाळ, माजी सभापती राजू लडके, संजय वासेकर, सहा. गटविकास अधिकारी डॉ.बंडू आकनुरवार, गटशिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश महाकाळकर, अशासकीय सदस्य निलेश पझारे, कृषी अधिकारी महेंद्र डाखरे आणि पंचायत विस्तार अधिकारी महेश मिलमिले उपस्थित होते.गटविकास अधिकारी आशुतोष सपकाळ यांनी दिव्यांगांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. माजी सभापती राजू लडके यांनी ही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी आशुतोष सपकाळ यांनी केले. संचालन वैशाली देशमुख तर आभार प्रदर्शन गटशिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश महाकाळकर यांनी केले.

## श्रीविठ्ठलाच्या संरक्षणासाठी 'वज्रलेप'च योग्य, आधुनिक लेपाला वारकऱ्यांचा विरोध



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.११, पंढरपूर :** श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील मुख्य मूर्तीच्या परीक्षणानंतर मूर्तीच्या संवर्धनासाठी कोणता लेप द्यावा यावरून चर्चा सुरू झाली असून,वारकरी संप्रदायाने पारंपरिक वज्रलेपाचाच आग्रहधरला आहे. आधुनिक रासायनिक लेपामुळे मूळ पाषाणाला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती वारकरी व तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. आषाढी यात्रेनंतर शेकडो वर्षांपासूनप्रक्षाळपूजाकरण्याची परंपरा आहे. लाखो भाविकांच्या स्पर्शाने व सततच्या अभिषेकाने झिजणाऱ्या मूर्तीच्या संरक्षणासाठी पारंपरिक वज्रलेप वापरला जातो. गरम पाणी, दह्यादूध, मध, साखर व आयुर्वेदिक काढ्याने स्नान घालून मूर्तीचा शिणवटा काढला जातो. या काळात देवाचे नित्योपचार बंद करून मूर्तीला विश्रांती दिली जाते.विठ्ठल मूर्ती ही 'कटिवर कर' असलेली प्राचीन पाषाण मूर्ती असून, ती वीरगळ प्रकारातील असावी असे अभ्यासकांचे मत आहे. अफजलखानाच्या स्वारीदरम्यानही मूर्ती लपवून ठेवण्यात आली होती, इतकी तिची प्राचीनता व महत्त्व आहे. अशा पुरातन मूर्तीवर रासायनिक लेप दिल्यास पाषाणाची मूळ रचना बदलण्याचा व कायमस्वरूपी नुकसान होण्याचा धोका आहे. वारकरी संप्रदायाचे म्हणणे आहे की,विठोबा हा भक्तांच्या प्रेमात रमणारा देव आहे. त्याच्या मूळ स्वरूपाशी छेडछाड नको. वज्रलेप हीच शास्त्रोक्त व परंपरागत पद्धत आहे. वारकरी संप्रदायाचे मुख्य दैवत श्रीविठ्ठल असून 'रामकृष्ण हरी' हा महामंत्र व 'पुंडलिक वरदा हरि विठ्ठल' हे घोषवाक्य आहे. नामस्मरण, समता व सेवा हीच खरी भक्ती मानणाऱ्या वारकऱ्यांसाठी मूर्तीचे पावित्र्य व परंपरा सर्वोच्च आहे. त्यामुळे मूर्ती संवर्धनासाठी केवळ पारंपरिक वज्रलेपच वापरावा, अशी एकमुखी मागणी संप्रदायातून होत आहे.